दर
महिन्याला
वाचकांच्या
भेटीला !

सप्टेंबर २०२२

# भवताल

हवा, पाणी, पर्यावरणाचा आरसा



आपल्या भवतालाचा व्यापक पद्धतीने धांडोळा घेणारे मराठी भाषेतील
एकमेव आणि दर्जेदार मासिक **परिसराविषयी भान असलेल्या सजग वाचकांसाठी**

फॅक्ट्स फिगर्स

पर्यावरणविषयक वस्तुस्थिती व आकडेवारी मांडणारे सदर

पीयूष सेकसेरिया

# मी, पोस्ट ऑफिस आणि लाल गळ्याचा माशीमार !

**लाल गळ्याचा माशीमार** (Taiga Flycatcher). **प्रजनन काळात नरांच्या गळ्यावर नारिंगी-लाल पंख येतात. या प्रजातीचे माशीमार मध्य आणि पूर्वी आशियात प्रजनन करतात.**

(फोटो सौजन्य : Spaceaero2)



मला एक पार्सल पाठवायचं होतं. त्यामुळे त्या दिवशी सकाळी ९ वाजताच मी माझ्या घराजवळील पोस्ट ऑफिसला गेलो होतो. खूप वेळ रांगेत उभं राहणं टाळायचं असेल तर सकाळी पोस्ट ऑफिस उघडण्यापूर्वीच तिथं हजर असणे हा सर्वोत्तम उपाय आहे, हे मी अनुभवातून शिकलोय. तोच मी त्या दिवशी अवलंबला होता. इथला कॅम्पस बऱ्यापैकी मोठा असून इमारतींच्या मध्ये थोडी मोकळी जागा आणि झाडंही आहेत. इथे आलो की मी ही झाडं आणि त्यावरील पक्षी आवर्जून न्याहाळत असतो. डिसेंबर महिना होता. वेडे राघू हवेत सूर मारून कीटकांची मेजवानी झोडण्यात मग्न होते. मला अचानक एक लहान पक्षी पटकन शेपूट झटकून उडून जाताना दिसला. ज्या वेगाने तो उडाला त्याच वेगाने तिथे निर्हेतुकपणे उभ्या असलेल्या एका ट्री गार्डवर (झाडांच्या रक्षणासाठी त्यांच्याभोवती लावली जणारी लोखंडी जाळी) तो पुन्हा येऊन बसला. त्याला जवळून बघण्यासाठी मी त्या पक्ष्याकडं चालायला लागलो तर तो लगेच उडाला. नजरेआड झाला नसला तरी स्पष्ट दिसणारही नाही अशा जागी जाऊन बसला. हा लाल छातीचा माशीमार (Red-breasted Flycatcher) तर नाही? मी मनात विचार केला. त्याचं संपूर्ण शरीर जवळपास तपकिरी रंगाचं होतं, पण गळ्यावर किंवा छातीवर लाल ठिपका दिसत नव्हता. यामुळे त्याला ओळखणं आणखीनच अवघड झालं होतं. मग हा तपकिरी माशीमार (Asian Brown Flycatcher) असेल की मग लाल गळ्याचा माशीमार (Taiga Flycatcher) ? मी खूपच गोंधळून गेलो होतो.

पोस्ट ऑफिस उघडलं होतं आणि मला जावं लागणार होतं. काम आटोपून मी पोस्ट ऑफिसमधून बाहेर आलो आणि बघितलं तर तो इवलासा जादूगार तिथंच होता. तिथला ट्री गार्ड ही त्याची बसण्याची आवडती जागा होती. माणसांचा अति कंटाळा असलेला हा पक्षी मला पाहताच उडून दुसऱ्या टोकाला जाऊन बसला. एक मात्र नक्की की या पक्ष्याचं थंडीतला मुक्काम पोस्ट होतं- 'ट्री गार्ड', पीसीएनटी पोस्ट ऑफिस, पुणे- ४११०४४.

## ६००० किलोमीटरचा प्रवास

या चिमुकल्या पक्ष्यात एवढं काय विशेष होतं? उण्यापुऱ्या ११ सेंटिमीटर म्हणजेच चार-साडेचार इंच लांबीचा हा पक्षी. त्याचं मूळ घर म्हणजे रशियातल्या सायबेरियन टाईगाचं अफाट जंगल. तिथं हा पक्षी प्रजनन आणि पिल्लांचं भरणपोषण करतो. शरद ऋतू सुरू झाला आणि कडाक्याची थंडी पडायला लागली की, हा पक्षी स्वेटर आणि माकडटोपी घालण्याच्या भानगडीत पडत नाही. अंगावर थोडी चरबी वाढवतो, योग्य मुहूर्त ठरवतो आणि सरळ आकाशात झेपावतो. मग सुमारे ६००० किलोमीटर अंतर पार करून आमचं पीसीएनटी पोस्ट ऑफिस गाठतो! त्याच्या प्रवासाच्या मार्गाची अजून तितकीशी माहिती झालेली नाही. परंतु, या प्रवासादरम्यान ताजातवाना होण्यासाठी तो काही थांबे घेत असण्याची दाट शक्यता आहे. वर्षानुवर्षे इतका लांबचा प्रवास करून तो प्रत्येक हिवाळ्यात आपल्या ठरलेल्या मुक्कामी अगदी अचूकपणे पोहोचतो.



**डार्क-साईडेड माशीमार** (Dark-sided Flycatcher) **प्रजननासाठी उंच हिमालयातील जंगलात राहणे पसंत करतो आणि हिवाळ्यात दक्षिणेकडे व कमी उंचीच्या प्रदेशात स्थलांतर करतो.**

मी पुन्हा एकदा कॅमेरा घेऊन येण्याचा व त्याचा एक चांगला फोटो घेण्याचा निश्चय केला. त्यामुळे मला निदान त्याला नीट ओळखता तरी येईल. साधारण हिवाळ्याच्या शेवटपर्यंत तो इथेच राहील!

## तो दिसला, पण...

त्याच दिवशी संध्याकाळी मी कॅमेरा घेऊन पोस्ट ऑफिसला पोहोचलो. ही जागा कशी?... तर तिथे फक्त कुत्री प्रातःविधीसाठी जातात. कुंपणाची भिंत आणि एक मोटारकार यांच्यामध्ये सँडविचप्रमणे उभा राहून मी शासकीय कुंपणाच्या आत डोकावत होतो, तेही कॅमेऱ्याची लांब लेन्स सोबत घेऊन आणि कार्यालयीन वेळ संपल्यावर! एकंदरीत या परिस्थितीमुळे पोलीस स्टेशन जवळच असल्याचं मला आठवलं. कोणी चौकशी केलीच... तर माझी रवानगी कुठे होऊ शकते याचा विचारही मनात तरळून गेला. तेवढ्यात एक माणूस त्याच्या जाडजूड लॅब्राडोर कुत्र्याला घेऊन त्या कारजवळ आला. लॅब्राडोरने कारच्या टायरचा वास घेतला, पण सुदैवानं त्याने कृतीतून किंवा त्याच्या मालकाने थेट मला कोणताही प्रश्न विचारला नाही.

तो पक्षी मात्र कुठेच दिसत नव्हता, मी वाट पाहत होतो. आणि अचानक तो दिसला, पटकन उडाला, बसला, पुन्हा उडाला, बसला! पण तो खूप दूर होता आणि उजेडही खूप कमी झाला होता, यावेळी चांगला फोटो येणं शक्य नव्हतं. तेव्हा मी फक्त त्याचं काळजीपूर्वक निरीक्षण करायचं ठरवलं. लाल छातीचा माशीमार आणि लाल गळ्याचा माशीमार यांच्यातील फरक कसा ओळखावा याविषयी मी थोडं वाचलं होतं आणि त्यामुळे मी जास्तच गोंधळून गेलो होतो. चोचीचा रंग, शेपटीच्या बाजूला असलेल्या पांढऱ्या पट्टीची लांबी आणि तीक्ष्णपणा, शेपूट फिरवण्याची पद्धत, आवाज या सर्वांविषयी लिहिल्यावर लेखकांनी या दोन पक्ष्यांमधील फरक ओळखणं अनेकदा जवळजवळ अशक्य असल्याचं जाहीर केलं होतं! ते काहीही असो, पण या लहानग्याच्या सायंकालीन कसरती पाहून मी आनंदित झालो होतो. एक कोशिश और सही, म्हणत मी पुन्हा येण्याचा निश्चय केला आणि घरी परतलो.

दुसऱ्या दिवशी मी थोडं लवकर, चांगला उजेड असताना पोस्ट ऑफिसात गेलो. पण पुन्हा तेच, फोटो काढण्याची संधी काही मिळाली नाही. मी आणखी एकदा प्रयत्न केला, पण



**लाल गळ्याचा माशीमार** (Taiga Flycatcher). **प्रजनन काळात नरांच्या गळ्यावर नारिंगी-लाल पंख येतात. या प्रजातीचे माशीमार मध्य आणि पूर्वी आशियात प्रजनन करतात.** (फोटो सौजन्य : Paramanu Sarkar)

याही वेळी नशिबाने काही साथ दिली नाही. हा जानेवारी महिना सुरू होता, हिवाळा संपायला तसा अजून वेळ होता. परत येऊ असा विचार करून मी पुन्हा घरी आलो.

पण त्याच दरम्यान आमच्या घरात अनपेक्षित आजारपण उद्भवलं. त्यात जानेवारी उलटून फेब्रुवारी कधी उजाडला ते कळालंच नाही. सगळं पुन्हा रुळावर येईस्तोवर मार्चही अर्धा संपला होता आणि उन्हाचा पारा ४० अंशांवर चढायला लागला होता. माशीमार आतापर्यंत नक्कीच माघारी गेला असेल. त्याचा एक चांगला फोटो घेऊन त्याला ओळखण्याची संधी मी गमावली होती. मी पोस्ट ऑफिसच्या माशीमाराबद्दल लिहायचं ठरवलं होतं, पण आता काय लिहिणार होतो?

## एकदम पुढच्या वर्षी??

हा पक्षी मला पुन्हा कधी दिसेल याची खात्री मला वाटत नव्हती. मागच्या वर्षी एक माशीमार आला होता, कदाचित याच प्रजातीचा, आमच्या शेजाऱ्यांच्या अंगणात. पण या हिवाळ्यात तो आला नाही. कोण जाणे, त्याला आपल्या हिवाळी मुक्कामासाठी एखादं जास्त चांगलं ठिकाण मिळालं असेल की प्रवासादरम्यान तो मरण पावला असेल? काय झालं हे कधीच कळू शकणार नाही. पण पोस्ट ऑफिसचा माशीमार पुढच्या वर्षी येईल आणि मी सुद्धा! मी स्वतःचीच समजूत घातली. मात्र हरवलेल्या संधीची, काहीतरी गमावल्याची भावना माझ्या मनातून जाता जाईना.

मार्चच्या शेवटी, मला फेसबुकवर लाल छातीच्या माशीमारचा फोटो दिसला, तो गुजरातमध्ये कुठेतरी काढलेला होता. याचा अर्थ या पक्ष्यांनी बहुतेक अजूनही परतीचा प्रवास आरंभिला नव्हता. माझ्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी पोस्ट ऑफिस गाठलं. यावेळी नेहमीपेक्षा थोडा उशीर झालेला असला तरी सूर्यप्रकाश बऱ्यापैकी होता. यात फोटो काढता येणार नसला तरी परिसर स्वच्छ दिसत होता. मी त्याच जागी उभा राहिलो आणि अगदी थोड्याशा हालचालीचीही नजर रोखून वाट पाहू लागलो. आणखी काही वेळ मी असाच वाट पाहत थांबलो आणि मग अचानक... टिंग, काहीतरी छोटंसं उडालं, पण ते काय हे मला कळलं नाही, काही वेळ तसाच गेला आणि मग ते परत एकदा उडालं, शेवटी ते एका ठिकाणी बसलं. हो, तो लाल गळ्याचा माशीमारच होता तो. हुर्रे, तो अजूनही इथंच होता!

## मिळाला एकदाचा फोटो

दुसऱ्याच दिवशी रविवार होता, सकाळी ८ च्या सुमारास मी माझ्या कुंपणाच्या भिंतीच्या ठिकाणी पोहोचलो, कॅमेरा काढला आणि माशीमार महाशयांची वाट पाहत बसलो. एक दयाळ पक्षी गात होता, तर एक लालबुडी बुलबुल गुरगुरत होती. मी आपलं लक्ष विचलित होऊ न देण्याचा पूर्ण प्रयत्न करत होतो. तो अचानक दिसला, पण लगेचच झाडांमध्ये गायबही झाला. मी आणखी थोडा वेळ वाट पाहिली. तो परत एकदा उडाला आणि दुसऱ्या अशा जागी बसला की तिथून मी त्याला पूर्णपणे पाहू शकत होतो. मी कॅमेऱ्याचा फोकस नीट केला आणि फोटो घेणारच तेवढ्यात माझ्या लक्षात आलं की मी सूर्याच्या विरुद्ध दिशेला होतो. त्यामुळे दुसरीकडे जाणं भाग होतं.

मी त्या इमारतीच्या दुसऱ्या बाजूला असलेल्या आणि रहिवासी

भागात उघडणाऱ्या गेटपर्यंत गेलो. तिथं एक बाई झाडत होत्या. ताई, मी त्यांना हाक मारल्यावर त्यांनी डोकं वर करून माझ्याकडं पाहिलं. तुमच्या अंगणात एक छोटा पक्षी आहे, मी तो पाहायला येऊ शकतो का? त्यांनी होकारार्थी मान हलवली आणि पुन्हा आपल्या कामाला लागल्या. सुदैवानं, माझ्या या अपेक्षेचं त्यांना विशेष आश्चर्य वाटलं नाही. मी त्या मोकळ्या जागेकडं गेलो. इथून तो स्पष्ट दिसत होता, पण तो बराच दूर होता. मी पटकन काही फोटो काढून घेतले. तो पुन्हा उडाला. त्याला बहुदा माणसांचा खूपच तिटकारा होता. तो एका छोट्या ढिगाऱ्यावर बसला. मी आणखी काही फोटो काढले. त्यातल्या त्यात दोन फोटो जरा बरे आले होते. मलाही ते थोडीच नॅशनल जिओग्राफिकला थोडंच पाठवायचे होते? मला तर फक्त हा खास माशीमार इथं आल्याचा पुरावा हवा होता.

## गळ्यावरील ठिपक्याचं रहस्य...

पण हे त्याच्या गळ्यावर काय होतं? ३ महिन्यांपूर्वीपर्यंत पूर्ण तपकिरी माशीमारच्या गळ्यावर आता एक विशिष्ट नारिंगी-लाल रंगाचा ठिपका दिसत होता! हा तोच पक्षी आहे का दुसरा कोणी? अगदी त्याच ठिकाणी दुसरा पक्षी येणं हे जवळपास अशक्य होतं. मग मलाच आधी त्याच्या गळ्यावरील ठिपका दिसला नव्हता का? की हा एक नर पक्षी होता आणि त्याला आताच प्रजनन काळातील पिसारा यायला लागला होता? काहीही असलं, तरी हे अतिशय अनपेक्षित होतं आणि आता त्याला ओळखणं बहुदा बरंच सोपंही होणार होतं. पण हे काय, हा भाऊ उडून आणखी दूर जाऊन बसला. आणखी थोडा वेळ त्याचं निरीक्षण करून मी घरी आलो आणि एखाद्या लहान मुलाप्रमाणे पोस्ट ऑफिसमधील माशीमारचे फोटो माझ्या आई-वडिलांना दाखवले.

कॅमेऱ्यातले फोटो मी "Ask I'd of Indian Birds' या फेसबुक ग्रुपवर टाकले. अतिशय अस्पष्ट फोटोवरूनही पक्ष्याची ओळख अचूकरित्या पटवण्यात या ग्रुपचे सदस्य निपुण आहेत. मीही या पक्ष्याविषयी थोडं वाचलं, त्यातून या प्रजातीच्या काही पक्ष्यांना ते आपल्या हिवाळ्यातील मुक्कामी असतानाच प्रजनन पिसारा यायला लागतो हे समजलं. ग्रुपवरही लवकरच कोणीतरी हा लाल गळ्याचा नर माशीमारच (Taiga Flycatcher) असल्याची पुष्टी केली! हा चिमुकला पक्षी दरवर्षी पूर्वी रशियाच्या टाईगा प्रदेशातील भव्य सूचीपर्णी जंगलातून माझ्या जवळच्या इमारतींमधील छोट्याशा हिरवाईपर्यंत येतो, तो तब्बल ६००० किलोमीटरचा प्रवास करून! हे आश्चर्य पचवणं मला अजूनही जड जात होतं.

तो आता कोणत्याही क्षणी परतीच्या प्रवासाला निघण्याची शक्यता होती. मी अतिशय आनंदी होतो, कारण पुढच्या शरद ऋतूत तो कुठे असेल हे मला एकदाचं समजलं होतं. मी त्याला प्रत्यक्ष भेटायला येऊ शकलो नाही तरी एक रजिस्टर्ड पोस्ट पार्सल तरी नक्कीच पाठवू शकेन, त्याच्या पुढील पत्त्यावर-

श्री. लाल गळ्याचा माशीमार,
द्वारा पीसीएनटी पोस्ट ऑफिस, पुणे-४११०४४.



**लाल गळ्याचा** (Taiga), **लाल छातीचा** (Red-breasted) **आणि कश्मीरी** (Kashmir) **माशीमार यांची प्रजनन क्षेत्रे काही प्रमाणात ओव्हरलॅप होतात. त्यांच्यातील फरक ओळखणे कठीण असते. ते त्यांच्या तपकिरी अवतारात आढळल्यास तर हे अधिकच कठीण बनते.** (फोटो सौजन्य : Arun Shank)

## फॅक्ट्स – फिगर्स

▶ लाल गळ्याचा माशीमार भारतातील सर्वांत छोट्या माशीमारांपैकी एक आहे. हा प्रवासी पक्षी हिवाळ्यात भारतात येतो. तो हिवाळ्यात ईशान्य, पूर्व आणि मध्य भारतासह पूर्वी घाटापासून ते पश्चिम महाराष्ट्र आणि गोव्यापर्यंत आढळतो. माशीमार हा पक्ष्यांचा एक खूप मोठा समूह आहे. त्याची जागतिक स्तरावर दोन कुळात विभागणी केली जाते– युरोप, आफ्रिका, आशिया खंडातील जुन्या जगातील माशीमार आणि अमेरिका खंडातील नव्या जगातील माशीमार. जगभरात माशीमारच्या ३०० प्रजाती आहेत. त्यातील जवळपास ३७ खऱ्या माशीमार प्रजाती भारतात आढळून येतात. काही पक्ष्यांच्या नावात 'माशीमार' (flycatcher) असले तरी ते शास्त्रीयदृष्ट्या माशीमार कुळात मोडत नाहीत. उदा. झरीरवळीश षश्रूलरींलहशी अर्थात स्वर्गीय नर्तक. येथे दिलेली माहिती मुख्यत: जुन्या जगातील माशीमारांविषयी असून त्यातही भारतात दिसून येणाऱ्या माशीमारांवर केंद्रित आहे.

**सामान्य नाव : माशीमार**

**प्राणिशास्त्रीय नाव**

**कुळ** – Muscicapidae

**उपकुळ** – Muscicapinae

**भारतातील प्रजाती**

Muscicapa जातीच्या ६ प्रजाती, Ficedula जातीच्या १३ प्रजाती. लाल गळ्याचा माशीमार (Ficedula albicilla) याच जातीत येतो. Eumyias जातीच्या ३ प्रजाती Niltava जातीच्या ४ प्रजाती Cyornis जातीच्या ९ प्रजाती Cyanoptila, Culicicapa, Muscicapella यांच्यातील प्रत्येकी एक प्रजाती.

Monarchinae (monarch flycatchers) आणि Rhipidurinae (fantailed flycatchers) यांच्या नावात flycatcher अर्थात माशीमार हा शब्द असला तरी हे प्राणिशास्त्रीयदृष्ट्या खरे माशीमार नाहीत.

**आकार**

लांबी ९ ते २२ सेंटिमीटर

**लाल छातीचा माशीमार** (Red-breasted). **पूर्वी युरोप आणि पश्चिम आशियातील लाल गळ्याच्या प्रजातीशी जवळचा संबंध असलेला हा पक्षी हिवाळ्यात भारतीय द्वीपकल्पात आढळतो.** (फोटो सौजन्य : David Raju)



**वर्णन**

अतिशय वैविध्यपूर्ण रूपे.

अनेक प्रजातींचा रंग फिक्कट तपकिरी, प्रजनन काळात मनमोहक पिसारा.

शेपूट निमुळती, डोळे मोठे. हवेतच कीटक पकडता यावेत म्हणून चोच चपटी.

बहुतेक माशीमार आखूड पायांवर ताट बसतात.

काहींच्या चोचीवर चोची इतकेच लांब राठ केस. त्यांची कीटक पकडण्यात मदत होते.

जमिनीवर चरणाऱ्या काही माशीमार प्रजातींची चोच बारीक.

पंख लांब, त्यामुळे हवेत चपळ हालचाली तसेच लांब पल्ल्याचा प्रवास शक्य.

**अधिवास**

वेगवेगळ्या प्रजातींचे विशिष्ट अधिवास, त्यातही विशिष्ट भागात वास्तव्य. उदा. निलांग माशीमार (Verditer Flycatcher) जंगलाच्या वृक्षावरणाच्या वर राहतो. टिकेलचा निळा माशीमार (Tickell's Blue Flycatcher) जंगल, माळराने, बागा असा जमिनीजवळ राहतो.

जवळपास सर्व भारतभर आढळ. समुद्र सपाटी ते ३५०० मीटर उंच पर्वतांवर; शुष्क, खुरट्या झाडीचे गवताळ प्रदेशे ते घनदाट उष्णकटिबंधीय जंगले; हिमालयातील पर्वतीय वनांमध्येसुद्धा.

काही प्रजाती एकाच प्रदेशात राहतात. बहुतांश प्रजाती कमी–जास्त प्रमाणात स्थलांतर करतात. उत्तरेकडील प्रजाती हिवाळ्यात दक्षिणेत येतात. इतर काही उंचावरील

क्षेत्रात जातात, तर काही स्थानिक पातळीवर स्थलांतर करतात. हे पक्षी प्रत्येक हिवाळ्यात वर्षानुवर्षे एकाच भागात येत राहतात.

### आहार

पंख असलेल्या कीटकांची शिकार करतात. पण काही माशीमार फांद्यांवरील आणि जमिनीवरील कीटकही खातात. कीटक हे प्रमुख अन्न.

### वर्तन

अनेकदा हवेत घिरट्या घालत कीटक पकडताना दिसतात. कधी हवेतच कीटक मटकावतात, कधी जमिनीवरील कीटकांवर ताव मारतात.

काही धाडसी असतात, तर काही लाजाळू आणि लपून बसणारे.

एकटे किंवा जोडप्याने राहतात. प्रजनन काळ नसताना इतर पक्ष्यांच्या मिश्र थव्यांतही सामील होतात.

**टिकेलचा निळा माशीमार** (Tickell's Blue Flycatcher) **या प्रजातीतील हा नर. ही जंगलप्रेमी प्रजाती असून, हे पक्षी बागा आणि उद्यानांमध्ये सहज आढळतात.**
(फोटो सौजन्य : Sumeet Moghe)





**निलांग माशीमार** (Verditer Flycatcher) **हिमालयात दक्षिण-पूर्व आशिया ते सुमात्रापर्यंत आढळतो. हा मुख्यत्त्वे विजेच्या तारांवर आणि झाडांच्या शेंड्यांवर बसून, कॅनोपीच्या वरच्या पातळीवर चरतो. हिवाळ्यात हा द्वीपकल्पीय भारतात स्थलांतर करतो.**
(फोटो सौजन्य : Prasanna Mamidala)

### घरटे

वेगवेगळ्या प्रजातींनुसार वेगवेगळी. झाड किंवा खडकाच्या कड्यावर चांगल्याप्रकारे बांधलेली. 'कप'च्या आकाराची. किंवा झाडात आधीच असलेल्या बिळात केलेली.

### धोके

बहुतेक प्रजातींविषयी असलेली अत्यंत त्रोटक माहिती हे मोठे आव्हान.

काही प्रजाती अत्यंत प्रदेशनिष्ठ आणि त्यांचे क्षेत्र खूपच मर्यादित.

मानवी हस्तक्षेप आणि वातावरण बदलांमुळे अधिवासांचा विनाश यामुळे त्यांच्या अस्तित्वाला मोठा धोका निर्माण होऊ शकतो.

जगभरात कीटकांची संख्या घटत असल्याचाही विपरीत परिणाम होत असावा.

आताशा कीटकांच्या संख्येतील चढ-उतारांचा हंगामही बदलला आहे. पूर्वी कीटकांच्या संख्येतील वाढ आणि माशीमारांचा प्रजनन काळ एकाच वेळी घडत असे. परंतु आता यात बदल झाल्याने माशीमारांच्या प्रजनन यशस्वितेवरही त्याचे दुष्परिणाम होणे शक्य आहेत.

*(फॅक्ट्स-फिगर्ससाठी डॉ आशुतोष सिंग यांनी माहिती पुरविली तसेच शशांक दळवी यांच्या Delhibirds साठीच्या "Flycatchers of India' या व्याख्यानाचाही उपयोग झाला. या दोहोंचे आभार.)*



■ **पीयूष सेकसेरिया**
**लेखक वन्यजीव अभ्यासक आहेत.**
peeyush.sekhsaria@gmail.com

(अनुवाद - **परीक्षित सूर्यवंशी)**